3 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# महर्षी शिंदे यांचा बहुजनवाद सर्वसमावेशक

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय चर्चासत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा बहुजनवाद समजून घेणे ही काळाची गरज आहे. महर्षी शिंदे यांचा बहुजनवाद हा समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेणारा सर्वसमावेशक स्वरूपाचा होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनामार्फत वि.स. खांडेकर भाषा भवन सभागृहात चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये 'महर्षी वि.रा. शिंदे यांची बहुजनविचाराची संकल्पना आणि सद्यस्थिती' या विषयावर त्यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. गो.मा. पवार होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन.डी. पाटील यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.



कोल्हापूर : चर्चासत्रात बोलताना डॉ. सदानंद मोरे.

डॉ. मोरे म्हणाले, काँग्रेसच्या चळवळीपासून अंतर राखून असणाऱ्या बहुजन समाजाच्या मनात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करण्याचे महानकार्य महर्षी शिंदे यांनी केले. बहुजन समाजामध्ये स्वतःच्या उद्धाराची चेतना निर्माण करणारे ते एक आद्य समाज क्रांतीकारक होते. अठरापगड जातीच्या लोकांनी एकत्र येऊन स्वराज्याच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी सभा घेतल्या. बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक प्रयोग केले. त्या काळात सर्वांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील होते. पक्षीय राजकारण हे जातीच्या नव्हे, तर आर्थिक पायावर उभे राहिले पाहिजे, असे त्यांचे ठाम मत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. एन.डी. पाटील म्हणाले, पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात महर्षी वि.रा. शिंदे यांचे कार्य आणि कर्तृत्व अद्वितीय आहे. ज्या कालखंडात त्यांनी काम केले, त्या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात चिंताजनक वातावरण होते. सामाजिक चळवळीबद्दल समाजातच मोठी अनास्था होती. सामाजिक क्षेत्रात काळाच्या पुढे जाऊन पुरोगामी पाऊल उचलणारे आणि राजकीय क्षेत्रातही आपले वैचारिक योगदान देणारे महर्षी शिंदे हे महान समाजचिंतक होते. दुर्दैवाने त्यांच्या कार्याची महाराष्ट्राने म्हणावी तितकी दखल घेतली नसल्याची खंत व्यक्त करत त्यांच्या कार्याचा अभ्यास सामाजिक महाराष्ट्राच्या दृष्टीने गरजेचा असल्याचे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गो. मा. पवार यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी डॉ. टी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी आभार मानले. यावेळी महर्षी शिंदे यांची नात सुजाता पवार यांच्यासह 'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. गोपाळ गुरू, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, डॉ. रविंद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, सदा डुम्बरे, सुरेश शिपूरकर, उन्मेष अमृते, डॉ. राजन गवस, सुजाता पवार, डॉ. रणधीर शिंदे आदी उपस्थित होते.

- 3 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# महर्षी शिंदेंचा बहुजनवाद सर्वसमावेशक

## सदानंद मोरे : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा बहुजनवाद हा समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेणारा सर्वसमावेशक स्वरूपाचा होता. त्यांचा हा बहुजनवाद समजून घेणे ही आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बीज भाषक म्हणून ते बोलत होते. विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गो. मा. पवार होते, तर ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील प्रमुख उपस्थित होते.

या चर्चासत्राचा विषय 'महर्षी वि. रा. शिंदे यांची बहुजन विचारांची संकल्पना आणि सद्य:स्थिती' असा होता. डॉ. मोरे म्हणाले, काँग्रेसच्या चळवळीपासून अंतर राखून असणाऱ्या बहुजन समाजाच्या मनात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य महर्षी शिंदे यांनी केले. बहुजन समाजामध्ये स्वत:च्या उद्धाराची चेतना निर्माण करणारे ते एक आद्य समाजसुधारक व समाजक्रांतिकारक होते. बहुजन समाजाच्या माध्यमातून त्यांनी समाजसुधारणेसाठी अनेक सामाजिक प्रयोग केले. त्या काळात सर्वांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील होते. पक्षीय राजकारण हे जातीच्या नव्हे, तर आर्थिक पायावर उभे राहिले पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. त्यांच्या या मतांची आज निकड जाणवते.

डॉ. पवार म्हणाले, महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात महर्षी शिंदे यांनी मोठी घुसळण केली. महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाचे युगप्रवर्तक कार्य केले. त्यानंतरच्या काळात त्यांचे कार्य पुढे सुरु ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी महर्षी शिंदे यांनी बजावली.

यावेळी डॉ. टी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास महर्षी शिंदे यांची नात सुजाता पवार, डॉ. नागनाथ कोतापल्ले, गोपाळ गुरु, रवींद्र ठाकूर, विश्वनाथ शिंदे, भारती पाटील, मेघा पानसरे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, सदा डुम्बरे, सुरेश शिपूरकर, उन्मेष अमृते, आदी उपस्थित होते.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठात सोमवारी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून डॉ. टी. एस. पाटील, रणधीर शिंदे उपस्थित होते.

### महाराष्ट्राने तितकी दखल नाही घेतली

- पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य आणि कर्तृत्व अद्वितीय आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी केले. ते म्हणाले, ज्या कालखंडात त्यांनी काम केले, त्या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात चिंताजनक वातावरण होते.
- सामाजिक चळवळीबद्दल समाजातच मोठी अनास्था होती. सामाजिक क्षेत्रात काळाच्या पुढे जाऊन अतिशय पुरोगामी पाऊल उचलणारे आणि राजकीय क्षेत्रातही आपले वैचारिक योगदान देऊन स्थान निर्माण करणारे महर्षी शिंदे हे महान समाजचिंतक होते.
- दुर्दैवाने त्यांच्या कार्याची महाराष्ट्राने म्हणावी तितकी दखल घेतली नाही. त्यांच्या कार्याचा अभ्यास सामाजिक महाराष्ट्राच्या परिप्रेक्ष्यातून करण्याची गरज आहे.

3 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# विठ्ठल रामजी शिंदे आद्य समाजक्रांतिकारक

## डॉ. सदानंद मोरे : शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २ : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा बहुजनवाद समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेणारा सर्वसमावेशक स्वरूपाचा होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी वि. रा. शिंदे यांची बहुजन विचाराची संकल्पना आणि सद्यःस्थिती या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. गो. मा. पवार होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, ""काँग्रेसच्या चळवळीपासून अंतर राखून असणाऱ्या बहुजन समाजाच्या मनात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य महर्षी शिंदे यांनी केले. बहुजन समाजामध्ये स्वतःच्या उद्धाराची चेतना निर्माण करणारे ते एक आद्य समाजक्रांतिकारक होते. अठरापगड जातीच्या लोकांनी एकत्र येऊन स्वराज्याच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी सभा घेतल्या. बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक प्रयोग केले. त्या काळात सर्वांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील होते.''



डॉ. सदानंद मोरे

डॉ. पाटील म्हणाले, ''पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य आणि कर्तृत्व अद्वितीय आहे. ज्या कालखंडात त्यांनी काम केले, त्या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात चिंताजनक वातावरण होते. सामाजिक चळवळीबद्दल समाजातच मोठी अनास्था होती. सामाजिक क्षेत्रात काळाच्या पुढे जाऊन अतिशय पुरोगामी पाऊल उचलणारे आणि राजकीय क्षेत्रातही आपले वैचारिक योगदान देऊन स्थान निर्माण करणारे महर्षी शिंदे हे महान समाजचिंतक होते. दुर्दैवाने त्यांच्या कार्याची महाराष्ट्राने म्हणावी तितकी दखल घेतली नाही.''

डॉ. पवार म्हणाले, ''महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात महर्षी शिंदे यांनी मोठी घुसळण केली. महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाचे युगप्रवर्तक कार्य केले. त्यानंतरच्या काळात त्यांचे कार्य पुढे सुरू ठेवण्याची कामगिरी महर्षी शिंदे यांनी बजावली.''

डॉ. टी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी महर्षी शिंदे यांच्या नात सुजाता पवार यांच्यासह डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. गोपाळ गुरू, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, सदा डुम्बरे, सुरेश शिपूरकर, उन्मेष अमृते आदी उपस्थित होते. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी आभार मानले.

-3 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# शिंदेंचा बहुजनवाद सर्वसमावेशक

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा बहुजनवाद हा समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेणारा होता. त्यांचा हा बहुजनवाद समजून घेणे ही आजची गरज आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी आज येथे केले.



शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे, व्यासपीठावर डावीकडून डॉ. राजन गवस, सुजाता पवार, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. गो. मा. पवार, प्रा. टी.एस. पाटील, डॉ. रणधीर शिंदे आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनामार्फत 'महर्षी वि. रा. शिंदे यांची बहुजन विचारांची संकल्पना आणि सद्यस्थिती' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या चचर्चासत्राचे उद्घाटन डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. गो. मा. पवार होते.

**डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन**

डॉ. मोरे म्हणाले,'कॉंग्रेसच्या चळवळीपासून अंतर राखून असणाऱ्या बहुजन समाजाच्या मनात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य महर्षी शिंदे यांनी केले. बहुजन समाजामध्ये स्वत:च्या उद्धाराची चेतना निर्माण करणारे ते एक आद्य समाज क्रांतीकारक होते. अठरा पगड जातीच्या लोकांनी एकत्र येऊन स्वराज्याच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी सभा घेतल्या. बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक प्रयोग केले.'

डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, 'पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य आणि कर्तृत्व अद्वितीय आहे. ज्या कालखंडात त्यांनी काम केले, त्या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात चिंताजनक वातावरण होते. सामाजिक चळवळीबद्दल समाजातच मोठी अनास्था होती. सामाजिक क्षेत्रात काळाच्या पुढे जाऊन अतिशय पुरोगामी पाऊल उचलणारे आणि राजकीय क्षेत्रातही आपले वैचारिक योगदान देऊन स्थान निर्माण करणारे महर्षी शिंदे हे महान समाजचिंतक होते.'

अध्यक्षीय भाषणात डॉ. गो. मा. पवार म्हणाले, 'महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात महर्षी शिंदे यांनी मोठी घुसळण केली. महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाचे युगप्रवर्तक कार्य केले. त्यानंतरच्या काळात त्यांचे कार्य पुढे सुरू ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी महर्षी शिंदे यांनी बजावली.' यावेळी डॉ. टी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महर्षी शिंदे यांची नात सुजाता पवार , डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. गोपाळ गुरू, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, सदा डुम्बरे, सुरेश शिपूरकर आदी उपस्थित होते.

F 3 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# महर्षी वि. रा. शिंदे यांचा बहुजनवाद सर्वसमावेशक

## - डॉ. सदानंद मोरे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा बहुजनवाद हा समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेणारा सर्वसमावेशक स्वरूपाचा होता. त्यांचा हा बहुजनवाद समजून घेणे ही आजची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनामार्फत 'महर्षी वि. रा. शिंदे यांची बहुजन विचाराची संकल्पना आणि सद्यःस्थिती' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बीजभाषक म्हणून बोलत होते. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी डॉ. गो. मा. पवार होते, तर ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांनी चर्चासत्राचे उद्घाटन केले.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, काँग्रेसच्या चळवळीपासून अंतर राखून असणाऱ्या बहुजन समाजाच्या मनात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य महर्षी शिंदे यांनी केले. बहुजन समाजामध्ये स्वतःच्या उद्धाराची चेतना निर्माण करणारे ते एक आद्य समाज क्रांतिकारक होते. अठरापगड



जातींच्या लोकांनी एकत्र येऊन स्वराज्याच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी सभा घेतल्या. बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक प्रयोग केले. त्या काळात सर्वांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील होते. पक्षीय राजकारण हे जातीच्या नव्हे, तर आर्थिक पायावर उभे राहिले पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते, असेही ते म्हणाले.

डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य आणि कर्तृत्व अद्वितीय आहे. ज्या कालखंडात त्यांनी काम केले, त्या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात चिंताजनक वातावरण होते. सामाजिक चळवळीबद्दल समाजातच मोठी अनास्था होती. सामाजिक क्षेत्रात काळाच्या पुढे जाऊन अतिशय पुरोगामी पाऊल उचलणारे आणि राजकीय क्षेत्रातही आपले वैचारिक योगदान देऊन स्थान निर्माण करणारे महर्षी शिंदे हे महान समाजचिंतक होते. दुर्दैवाने त्यांच्या कार्याची महाराष्ट्राने म्हणावी तितकी दखल घेतली नाही. त्यांच्या कार्याचा अभ्यास सामाजिक महाराष्ट्राच्या परिप्रेक्ष्यातून करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गो. मा. पवार म्हणाले, महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात महर्षी शिंदे यांनी मोठी घुसळण केली. महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाचे युगप्रवर्तक कार्य केले. त्यानंतरच्या काळात त्यांचे कार्य पुढे सुरू ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी महर्षी शिंदे यांनी बजावली.

यावेळी डॉ. टी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी आभार मानले. यावेळी महर्षी शिंदे यांची नात सुजाता पवार यांच्यासह डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. गोपाळ गुरू, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, सदा डुम्बरे, सुरेश शिपूरकर, उन्मेष अमृते आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 JAN 2017
तरुण भारत

# विश्वकोश निर्मिती मंडळाचा विद्यापीठाशी सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यादरम्यान विद्यापीठात आधुनिक इतिहास, राज्यशास्त्र आणि मराठी साहित्य या तीन विषयांची ज्ञानमंडळे स्थापन करण्याबाबत सामंजस्य करार झाला. मंडळाचे प्रमुख अध्यक्ष तथा संपादक दिलीप करंबेळकर उपस्थित होते.

सामंजस्य करारांवर विश्वकोश निर्मिती मंडळाच्या वतीने सचिव सुवर्णा पवार यांनी तर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. अरुणचंद्र पाठक, राजशेखर सोलापुरे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. पद्मजा पाटील, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनिश पाटील, डॉ. अरुण भोसले, विश्वकोश मंडळाचे सहाय्यक संपादक सरोजकुमार मिठारी, डॉ. जगतानंद भटकर, राजस वैशंपायन, उमाकांत खामकर आदी उपस्थित होते.

विद्यापीठांमध्ये ज्ञानमंडळांची स्थापना करून त्यांच्या माध्यमातून ज्ञानवर्धन करण्याचा महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचा उपक्रम अत्यंत समाजोपयोगी आहे. जागतिक स्तरावरील विविध ज्ञानशाखांमधील ज्ञान मराठी भाषेत आणण्यामध्ये मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची महत्त्वाची भूमिका आहे. आता नवतंत्रज्ञान आणि ज्ञानाची वाढत असलेली व्याप्ती आणि होत असलेला विस्तार लक्षात घेता विद्यापीठांमधील तज्ज्ञांना त्यामध्ये सामावून घेण्याचा मंडळाचा हेतू अत्यंत स्तुत्य आहे, असे गौरवोद्गार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

### प्रकल्पाचे स्वरुप

मंडळाने निर्मिलेल्या २० विश्वकोश खंडांमधील नोंदींचे अद्ययावतीकरण करणे, विविध विषयांवरील नव्या माहितीची सातत्याने भर टाकणे यासाठी ज्ञानमंडळांची स्थापना केली आहे. प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करून ही सर्व ज्ञानमंडळे एकमेकांशी जोडणे व विश्वकोशाची पुढील रचना करणे, हा उद्देश आहे.